**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक २२/०२/२०२४**

आरोपी लोकसेवक- श्री. विनोद भाऊराव साळवे, वय 44 वर्षे, पद- तलाठी, सजा- शिंदी सिरसगाव ता.गंगापुर जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून 2000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री. विनोद भाऊराव साळवे, वय 44 वर्षे, पद- तलाठी, सजा- शिंदी सिरसगाव ता.गंगापुर जिल्हा छत्रपती संभाजीनगर रा. देवगाव रंगारी ता.कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | :- | 2000/-रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | 2000/- रुपये |
| सापळा अधिकारी | :- | श्री. दिलीप साबळे, पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या सातबारा उताऱ्यावर बँकेचा बोजा चढविण्याकरिता व महाराष्ट्र महसूल अधिनियम 1966 नमुना 9 ची नोटीस काढण्याकरिता. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांची माळीवाडगाव तालुका गंगापुर या ठिकाणी गट नंब. 62 येथे एक हेक्टर 44 आर शेतजमीन आहे. शेती विकासाची कामे करण्यासाठी त्यांनी आरबीएल बँक संभाजीनगर येथून बारा लाख 74 हजार 855 रुपयो कर्ज मंजुरीसाठी प्रस्ताव दिला आहे. कर्ज मंजूर होण्याकरिता तक्रारदार यांच्या सातबारा उताऱ्यावर बँकेचा बोजा चढविण्याकरिता व महाराष्ट्र महसूल अधिनियम 1966 नमुना 9 ची नोटीस काढण्याकरिता आरोपी लोकसेवक श्री. विनोद साळवे यांनी तक्रारदार यांच्याकडे 2000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 26/01/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. यांनी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष 2000/- रुपये लाचेची मागणी केली व त्याचवेळी 1000/- रुपये घेतले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे वेळोवेळी व आज दि. 22/02/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. विनोद साळवे यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारासमक्ष राहिलेले उर्वरीत 1000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन दौलताबाद छत्रपती संभाजीनगर शहर येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक दिलीप साबळे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार भिमराज जिवडे, दिगंबर पाठक, सुनिल पाटील, चालक पो.अं.सी.एन. बागुल, चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

२२/२/२४

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.